१५ (१७)

बैठकीसाठी

भारत सरकार
विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# हिंदू उत्तराधिकार अधिनियम, १९५६

(१९५६ चा अधिनियम क्रमांक ३०)

[५ डिसेंबर १९९१ रोजी यथाविद्यमान]

# Hindu Succession Act, 1956

(Act No. 30 of 1956)

[As in force on the 5th December 1991]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले.
१९९३

[किंमत : रुपये ३.०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ५ डिसेंबर १९९१ रोजी यथाविद्यमान असलेला हिंदू उत्तराधिकार अधिनियम, १९५६ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ३, अंक १, दिनांक ७ जानेवारी १९९२ यात पृष्ठ ४५ ते ५२ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली
दिनांक ७ जानेवारी १९९२.

व्ही. एस. रमादेवी,
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the Hindu Succession Act, 1956 as on the 5th December 1991 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*, Extraordinary Part XII, Section 1, No. 1, Vol. 3, dated 7th January 1992 on pages 45 to 52.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 7th January 1992.

V. S. RAMADEVI,
Secretary to the Government of India.

# हिंदू उत्तराधिकार अधिनियम, १९५६

## कलमांचा क्रम

कलमे

### प्रकरण १ ले

#### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव व विस्तार.
२. अधिनियम लागू करणे.
३. व्याख्या व निर्वचन.
४. अधिनियमाचा अधिभावी परिणाम.

### प्रकरण २ रे

#### अमृत्युपत्रीय उत्तराधिकार

५. विवक्षित संपत्तींना अधिनियम लागू नसणे.
६. सहदायकी संपत्तीतील हितसंबंध प्रक्रांत होणे.
७. तरवाड, तवज्जे, कुटुंब, कवर किंवा इल्लम यांच्या संपत्तीतील हितसंबंधाची प्रक्रांती.
८. पुरुषांच्या बाबतीत उत्तराधिकाराचे सर्वसाधारण नियम.
९. अनुसूचीतील वारसदारांमध्ये उत्तराधिकाराचा क्रम.
१०. अनुसूचीच्या १ ल्या वर्गामधील वारसदारांमध्ये संपत्तीचे वितरण.
११. अनुसूचीच्या २ ऱ्या वर्गामधील वारसदारांमध्ये संपत्तीचे वितरण.
१२. गोत्रज व भिन्न गोत्रज यांच्यामध्ये उत्तराधिकाराचा क्रम.
१३. श्रेणीची संगणना.
१४. हिंदू स्त्रीची संपत्ती ही तिची अबाधित संपत्ती असणे.
१५. हिंदू स्त्रियांच्या बाबतीत उत्तराधिकाराचे सर्वसाधारण नियम.
१६. हिंदू स्त्रीच्या वारसदारांमध्ये उत्तराधिकाराचा क्रम व वितरणाची रीत.
१७. मरुमक्कत्तायम व आळियसंतान कायद्यांनी नियंत्रित होणाऱ्या व्यक्तींसंबंधी विशेष उपबंध.
१८. सापत्न नात्यापेक्षा सख्ख्या नात्याला अधिमान.
१९. दोन किंवा अधिक वारसदारांच्या उत्तराधिकाराची पद्धत.
२०. गर्भस्थ अपत्याचे अधिकार.
२१. एकसमयावच्छेदी मृत्यूंच्या बाबतीत गृहीतक.
२२. विवक्षित बाबतीत संपत्ती संपादन करण्याचा अधिमानी अधिकार.
२३. राहत्या घरासंबंधी विशेष उपबंध.
२४. पुनर्विवाह करणाऱ्या विवक्षित विधवा वा विधवा म्हणून वारसदार होणार नाहीत.
२५. खुनी व्यक्ती निरर्ह.
२६. धर्मांतरित व्यक्तीचे वंशज निरर्ह.
२७. जेव्हा वारसदास निरर्ह असेल तेव्हाचा उत्तराधिकार.
२८. व्याधी, वैगुण्य इत्यादींमुळे, निरर्हता नाही.
२९. वारसदारांचा अभाव.

### प्रकरण ३ रे

#### मृत्युपत्रीय उत्तराधिकार

३०. मृत्युपत्रीय उत्तराधिकार.

### प्रकरण ४ थे

३१. निरसन.
३२. अनुसूची.

# हिंदू उत्तराधिकार अधिनियम, १९५६

(१९५६ चा अधिनियम क्रमांक ३०)[1]

[१७ जून १९५६]

(५ डिसेंबर १९९१ रोजी यथा विद्यमान)

**हिंदूमधील अमृत्युपत्रीय उत्तराधिकारासंबंधीचा कायदा विशोधित व संहिताबद्ध करण्यासाठी अधिनियम**
**भारतीय गणराज्याच्या सातव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—**

## प्रकरण १ ले

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास 'हिंदू उत्तराधिकार अधिनियम, १९५६' असे म्हणता येईल. — संक्षिप्त नाव व विस्तार.

(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे.

२. (१) हा अधिनियम पुढील व्यक्तींना लागू आहे :— — अधिनियम लागू करणे.

(क्) जी व्यक्ती धर्माने, त्याचे कोणतेही रूप किंवा विकसन यांनुसार हिंदू आहे अशी कोणतीही व्यक्ती—वीरशैव, लिंगायत, अथवा ब्रम्होसमाजाचा, प्रार्थनासमाजाचा किंवा आर्यसमाजाचा अनुयायी यांसुद्धा.

(ख्) जी व्यक्ती धर्माने बौद्ध, जैन किंवा शीख आहे अशी कोणतीही व्यक्ती, आणि

(ग्) जी व्यक्ती धर्माने मुस्लिम, ख्रिस्ती, पारशी किंवा ज्यू नाही अशी अन्य कोणतीही व्यक्ती—मात्र हा अधिनियम पारित झाला नसता तर यात परामर्श घेण्यात आलेल्यांपैकी कोणत्याही बाबींसंबंधी ती हिंदू कायद्याने अथवा त्या कायद्याचा भाग असलेल्या कोणत्याही रूढीने किंवा परिपाठाने नियंत्रित झाली नसती असे सिद्ध करण्यात आले तर गोष्ट अलाहिदा.

**स्पष्टीकरण.**—पुढील व्यक्ती धर्माने, हिंदू, बौद्ध, जैन किंवा प्रकरणपरत्वे, शीख आहेत :—

(क्) ज्याच्या मातापित्यांपैकी दोघेही धर्माने हिंदू, बौद्ध, जैन किंवा शीख आहेत असे कोणतेही औरस किंवा अनौरस अपत्य ;

(ख्) ज्याच्या मातापित्यांपैकी एकजण धर्माने हिंदू, बौद्ध, जैन किंवा शीख आहे आणि अशी माता वा पिता ज्या जनजातीतील, समाजातील, समूहातील, किंवा कुळातील आहे किंवा होता त्याचा घटक म्हणून ज्याचे पालनपोषण करण्यात आले आहे असे कोणतेही औरस किंवा अनौरस अपत्य; आणि

(ग्) जी व्यक्ती हिंदू, बौद्ध, जैन किंवा शीख धर्मात धर्मांतरित किंवा पुनर्धर्मांतरित झाली आहे अशी कोणतीही व्यक्ती.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट संविधानाचा अनुच्छेद ३६६ याचा खंड (२५) याच्या अर्थानुसार कोणत्याही अनुसूचित जनजातीच्या घटकव्यक्तींना लागू असणार नाही—मात्र केंद्र शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अन्यथा निदेशित केले तर गोष्ट अलाहिदा.

(३) या अधिनियमाच्या कोणत्याही भागातील "हिंदू" या शब्दप्रयोगात, जी व्यक्ती धर्माने हिंदू नसली तरी या कलमात अंतर्भूत असलेल्या उपबंधांच्या आधारे जिला हा अधिनियम लागू होतो अशी व्यक्ती आहे त्या व्यक्तीचा जणू काही समावेश होतो, अशा तऱ्हेने या शब्दप्रयोगाचा अर्थ लावला जाईल.

३. (१) या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— — व्याख्या व निर्वचन.

(क्) "गोत्रज"—जर दोन व्यक्ती रक्ताच्या किंवा दत्तकाच्या नात्याने व संपूर्णपणे पुरुषांच्या द्वारे संबंधित असतील तर एक व्यक्ती दुसरीची "गोत्रज" आहे असे म्हणतात;

(ख्) "आळियसंतान कायदा" याचा अर्थ, जर हा अधिनियम पारित झाला नसता तर ज्या व्यक्ती "मद्रास आळियसंतान अधिनियम, १९४९" (१९४९ चा मद्रास अधिनियम ९) याद्वारे किंवा या अधिनियमात ज्यांच्यासाठी उपबंध केला आहे अशा बाबींच्या संबंधात रूढीप्राप्त आळियसंतान कायद्याने नियंत्रित झाल्या असत्या त्यांना लागू असलेली विधिप्रणाली असा आहे;

(ग्) "भिन्न गोत्रज"—जर दोन व्यक्ती रक्ताच्या किंवा दत्तकाच्या नात्याने, पण संपूर्णपणे पुरुषांच्याच द्वारे नव्हे,—अशा प्रकारे संबंधित असतील तर, एक व्यक्ती दुसरीची "भिन्न गोत्रज" आहे असे म्हणतात;

---

१. १९५८ चा केरळ अधिनियम २५ याद्वारे हा अधिनियम केरळमध्ये विशोधित करण्यात आला आहे.

एच ४३१३—२ (१०३४—११-९३)

(घ) "रूढी" व "परिपाठ" या शब्दप्रयोगांद्वारे, जो नियम सातत्याने व एकाच रूपात दीर्घकाळ पाळला जात असून ज्याला हिंदूंमध्ये कोणत्याही स्थानिक क्षेत्रात, जनजातीत, समाजात, समूहात किंवा कुळात कायद्याचे बळ प्राप्त झालेले आहे असा कोणताही नियम दर्शविला जातो :

परंतु, तो नियम निश्चित असावा आणि गैरवाजवी किंवा लोकधोरणाच्या विरुद्ध नसावा : आणि आणखी असे की, फक्त कुलालाच लागू असलेल्या नियमांच्या बाबतीत, त्या कुलाने तो सोडून दिलेला नसावा;

(ङ) "सख्खे नाते", "सापत्न नाते" आणि "सहोदर नाते"—

(एक) जेव्हा दोन व्यक्तींचा समान पूर्वजपुरुषापासून त्याच्या एकाच पत्नीच्या द्वारे वंशोद्भव झालेला असतो तेव्हा, त्या एकमेकींशी सख्ख्या नात्याने आणि जेव्हा त्यांचा समान पूर्वजपुरुषापासून पण त्याच्या निरनिराळ्या पत्नींच्या द्वारे वंशोद्भव झालेला असतो तेव्हा, त्या व्यक्ती एकमेकींशी सापत्न नात्याने संबंधित आहेत असे म्हणतात ;

(दोन) जेव्हा दोन व्यक्तींचा समान पूर्वजस्त्रीपासून पण तिच्या निरनिराळ्या पतींच्या द्वारे वंशोद्भव झालेला असतो तेव्हा, त्या व्यक्ती एकमेकींशी सहोदर नात्याने संबंधित आहेत असे म्हणतात;

स्पष्टीकरण.—या खंडामध्ये "पूर्वजपुरुष" यात पित्याचा व "पूर्वजस्त्री" यात मातेचा समावेश आहे;

(च) "वारसदार" याचा अर्थ, जी व्यक्ती या अधिनियमाखाली अकृतमृत्युपत्र व्यक्तीच्या संपत्तीची उत्तराधिकारी होण्यास हक्कदार आहे अशी कोणतीही व्यक्ती—पुरुष वा स्त्री—असा आहे;

(छ) "अकृतमृत्युपत्र व्यक्ती"—एखाद्या व्यक्तीने ज्या संपत्तीची परिणामक होण्याजोगी अशी मृत्युपत्रीय व्यवस्था केलेली नसेल तिच्यासंबंधी तो किंवा ती मृत्युपत्र न करता मरण पावली असे मानले जाते;

(ज) "मरुमक्कत्तायम कायदा" याचा अर्थ,—

(क) जर हा अधिनियम पारित झाला नसता तर, या अधिनियमात ज्यांच्यासाठी उपबंध केला आहे त्या बाबींच्या संबंधात ज्या व्यक्ती "मद्रास मरुमक्कत्तायम अधिनियम, १९३२" (१९३३ चा मद्रास अधिनियम, २२); 'त्रावणकोर नायर अधिनियम' (११०० क चा २); 'त्रावणकोर एझावा अधिनियम' (११०० क चा ३); 'त्रावणकोर नांजिनाडु वेळ्ळाळन अधिनियम' (११०१ क चा ६) 'त्रावणकोर क्षत्रिय अधिनियम' (११०८ क चा ७); 'त्रावणकोर कृष्णवक मरुमक्कथायी अधिनियम' (१११५ क चा ७); 'कोचीन मरुमक्कथायम अधिनियम' (१११३ क चा ३३); किंवा कोचीन नायर अधिनियम' (१११३ क चा २९) यांद्वारे नियंत्रित झाल्या असत्या; किंवा

(ख) ज्या व्यक्ती त्रावणकोर-कोचीन किंवा मद्रास राज्यात [१]- नोव्हेंबर १९५६ च्या निकटपूर्वी ते अस्तित्वात होते त्याप्रमाणे ज्यातील घटकव्यक्ती मोठ्या प्रमाणावर अधिवासी आहेत अशा कोणत्याही समाजाच्या आहेत आणि हा अधिनियम पारित झाला नसता तर, ज्या या अधिनियमात ज्यांच्यासाठी उपबंध केला आहे त्या बाबींच्या संबंधात, ज्या वारसा-पद्धतीत स्त्री-वंशक्रमाद्वारे वंशाचा मागोवा घेतला जातो अशा कोणत्याही वारसा-पद्धतीने नियंत्रित झाल्या असत्या,

त्या व्यक्तींना लागू असलेली विधिप्रणाली असा आहे, पण त्यात आळियसंतान कायद्याचा समावेश नाही;

(झ) "नंबूदिरी कायदा" याचा अर्थ, जर हा अधिनियम पारित झाला नसता तर, या अधिनियमात ज्यांच्यासाठी उपबंध केला आहे त्या बाबींच्या संबंधात ज्या व्यक्ती 'मद्रास नंबूदिरी अधिनियम, १९३२' (१९३३ चा मद्रास अधिनियम, २१); 'कोचीन नंबूदिरी अधिनियम' (१११३ क चा १७); किंवा 'त्रावणकोर मलयाळम ब्राम्हण अधिनियम' (११०६ क चा ३), यांद्वारे नियंत्रित झाल्या असत्या अशा व्यक्तींना लागू असलेली विधिप्रणाली असा आहे;

(ञ) "संबंधित" याचा अर्थ, औरस नात्याने संबंधित असा आहे :

परंतु, अनौरस अपत्ये त्यांच्या मातेशी व एकमेकांशी संबंधित असल्याचे मानले जाईल आणि त्यांचे औरस वंशज त्यांच्याशी व एकमेकांशी संबंधित असल्याचे मानले जाईल आणि नातेसंबंध व्यक्त करणाऱ्या किंवा नातलग दर्शविणाऱ्या कोणत्याही शब्दाचा अर्थ तदनुसार लावला जाईल.

(२) या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, पुल्लिंगवाचक शब्दांमध्ये स्त्रियांचा समावेश असल्याचे गृहीत धरले जाणार नाही.

---

१. विधि अनुकूलन (क्रमांक ३) आदेश, १९५६ द्वारे घातले.

**अधिनियमाचा अधिभावी परिणाम.**

४. (१) या अधिनियमात व्यक्तपणे उपबंधित केले असेल ते खेरीजकरून एरव्ही—

(क) हिंदू कायद्याचे कोणतेही वचन, नियम किंवा निर्वचन अथवा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी त्या कायद्याचा भाग म्हणून अंमलात असलेली कोणतीही रूढी किंवा परिपाठ या अधिनियमाते जिच्याकरता उपबंध केलेला आहे अशा कोणत्याही बाबींच्या संबंधात परिणामक असण्याचे समाप्त होईल;

(ख) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी अंमलात असलेला अन्य कोणताही कायदा या अधिनियमात अंतर्भूत असलेल्यापैकी कोणत्याही उपबंधाशी तो जेथवर विसंगत असेल तेथवर हिंदूंना लागू असण्याचे समाप्त होईल.

(२) शंकानिरसनार्थ याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टींमुळे, कृषि धारणजमिनींच्या तुकडेबंदीसाठी किंवा कमाल मर्यादांच्या निश्चितीसाठी अथवा अशा धारणजमिनीसंबंधी कुळवहिवाट अधिकारांच्या प्रक्रांतीसाठी उपबंध करणाऱ्या त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या उपबंधांवर परिणाम होतो असे मानले जाणार नाही.

---

## प्रकरण २ रे

## अमृत्युपत्रीय उत्तराधिकार

### सर्वसाधारण

**विवक्षित संपत्तींना अधिनियम लागू नसणे.**

५. हा अधिनियम पुढील प्रकारच्या संपत्तीला लागू होणार नाही :—

(एक) ज्या संपत्तीचा उत्तराधिकार 'विशेष विवाह अधिनियम, १९५४' (१९५४ चा ४३) कलम २१ मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधामुळे 'भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५' (१९२५ चा ३९) याद्वारे विनियमित होतो अशी कोणतीही संपत्ती;

(दोन) कोणत्याही भारतीय संस्थानाच्या अधिपतीने भारत सरकारशी केलेल्या कोणत्याही प्रसंविदेच्या किंवा कराराच्या अटींअन्वये अथवा या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी पारित केलेल्या कोणत्याही अधिनियमितीच्या तरतुदींनुसार, जी संपदा एका वारसदाराकडे जाते अशी कोणतीही संपदा;

(तीन) कोचीनच्या महाराजाने प्रख्यापित केलेल्या, दिनांक २९ जून १९४९ च्या उद्घोषणेद्वारे (११२४ चे ९) प्रदान केलेल्या शक्तींमुळे पॅलेस प्रशासन मंडळाने प्रशासिलेला पॅलेस निधी व वळिअम्म थम्पूरन कोविलकम संपदा.

**सहदायकी संपत्तीतील हितसंबंध प्रक्रांत होणे.**

६. जेव्हा एखादा हिंदू पुरुष या अधिनियमाच्या प्रारंभानंतर मृत्यू पावला असून त्याच्या मृत्यूसमयी मिताक्षरा सहदायकी संपत्तीत त्याचा हितसंबंध असेल तेव्हा, त्याचा त्या संपत्तीतील हितसंबंध उत्तरजीवित्वाच्या तत्त्वानुसार सहदायकीतील उत्तरजीवी सदस्यांकडे प्रक्रांत होईल, या अधिनियमानुसार नव्हे :

परंतु, जर मृताच्या मागे, अनुसूचीच्या १ ल्या वर्गामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्त्री-नातलग किंवा जो अशा स्त्री-नातलगामार्फत दावा सांगतो असा त्या वर्गातील विनिर्दिष्ट पुरुष-नातलग हयात असेल तर, मृताचा मिताक्षरा सहदायकी संपत्तीतील हितसंबंध या अधिनियमाखाली, मृत्युपत्रीय किंवा प्रकरणपरत्वे, अमृत्युपत्रीय उत्तराधिकारानुसार प्रक्रांत होईल, उत्तरजीवित्वाच्या तत्त्वानुसार नव्हे.

**स्पष्टीकरण १.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, हिंदू मिताक्षरा सहदायादाचा हितसंबंध हा त्याच्या मृत्यूच्या निकटपूर्वी जर संपत्तीची वाटणी झाली असती तर त्याला वाटून देण्यात आला असता तेवढा त्या संपत्तीतील हिस्सा असल्याचे मानले जाईल—मग वाटणी होण्याची मागणी करण्यास तो हक्कदार असो वा नसो.

**स्पष्टीकरण २.**—या कलमाच्या परंतुकात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, मृताच्या मृत्यूपूर्वी सहदायकीपासून जी स्वतः विभक्त झाली असेल ती किंवा तिच्या वारसांपैकी कोणीही त्यात निविष्ट केलेल्या हितसंबंधातील हिश्श्यावर दावा सांगण्यास विनामृत्युपत्रकेमुळे समर्थ होते असा त्या गोष्टीचा अर्थ लावला जाणार नाही.

**तरवड, तवज्जे, कुटुंब, कवरु किंवा इल्लम यांच्या संपत्तीतील हितसंबंधाची प्रक्रांती.**

७. (१) हा अधिनियम पारित झाला नसता तर ज्याला मरुमक्कत्तायम किंवा नंबूदिरी कायदा लागू झाला असता असा एखादा हिंदू या अधिनियमाच्या प्रारंभानंतर मृत्यू पावला असून त्याच्या किंवा तिच्या मृत्युसमयी, प्रकरणपरत्वे, तरवड, तवज्जे किंवा इल्लम यांच्या संपत्तीत त्याचा किंवा तिचा हितसंबंध असेल तेव्हा, त्या संपत्तीतील त्याचा किंवा तिचा हितसंबंध या अधिनियमाखाली, प्रकरणपरत्वे मृत्युपत्रीय किंवा अमृत्युपत्रीय उत्तराधिकारानुसार प्रक्रांत होईल, मरुमक्कत्तायम किंवा नंबूदिरी कायद्यानुसार नव्हे.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, एखाद्या हिंदूचा तरवड, तवज्जे किंवा इल्लम यांच्या संपत्तीतील हितसंबंध हा, त्याच्या किंवा तिच्या मृत्यूच्या निकटपूर्वी जर, तरवड, तवज्जे किंवा प्रकरणपरत्वे, इल्लम यांच्या त्यावेळी हयात असणाऱ्या सर्व घटकव्यक्तींमध्ये त्या संपत्तीची डोईवार वाटणी झाली असती तर, त्याच्याकडे किंवा तिच्याकडे आला असता असा, तरवड, तवज्जे किंवा प्रकरणपरत्वे, इल्लम यांच्या संपत्तीतील हिस्सा असल्याचे मानले जाईल—मग त्याला किंवा तिला लागू असलेल्या मरुमक्कत्तायम किंवा नंबूदिरी कायद्याखाली तो किंवा ती अशी वाटणी होण्याची मागणी करण्यास हक्कदार असो वा नसो—आणि असा हिस्सा त्याला किंवा तिला अबाधितपणे वाटून देण्यात आला असल्याचे मानले जाईल.

(२) हा अधिनियम पारित झाला नसता तर ज्याला आळियसंतान कायदा लागू झाला असता असा एखादा हिंदू, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर मृत्यू पावला असून त्याच्या किंवा तिच्या मृत्युसमयी, कुटुंब किंवा प्रकरणपरत्वे, कवर यांच्या संपत्तीत त्याचा किंवा तिचा अविभक्त हितसंबंध असेल तेव्हा, त्या संपत्तीतील त्याचा किंवा तिचा हितसंबंध या अधिनियमाखाली, मृत्युपत्रीय किंवा प्रकरणपरत्वे, अमृत्युपत्रीय उत्तराधिकारानुसार प्रक्रांत होईल, आळियसंतान कायद्यानुसार नव्हे.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, एखाद्या हिंदूचा कुटुंब किंवा कवर यांच्या संपत्तीतील हितसंबंध हा, त्याच्या किंवा तिच्या मृत्यूच्या निकटपूर्वी जर, प्रकरणपरत्वे, कुटुंब किंवा कवर यांच्या त्यावेळी हयात असणाऱ्या सर्व घटक व्यक्तींमध्ये त्या संपत्तीची डोईवार वाटणी झाली असती तर त्याच्याकडे किंवा तिच्याकडे आला असता असा, कुटुंब किंवा प्रकरणपरत्वे, कवर यांच्या संपत्तीमधील हिस्सा असल्याचे मानले जाईल —मग आळियसंतान कायद्याखाली तो किंवा ती अशी वाटणी होण्याची मागणी करण्यास हक्कदार असो वा नसो—आणि असा हिस्सा त्याला किंवा तिला अबाधितपणे वाटून देण्यात आला असल्याचे मानले जाईल.

(३) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा या अधिनियमाच्या प्रारंभानंतर एखादा स्थानमदार मृत्यू पावेल तेव्हा, त्याने धारण केलेली स्थानम् संपत्ती जणू काही स्थानमदाराच्या मृत्यूच्या निकटपूर्वी तो स्वतः व स्थानमदार ज्या कुटुंबातील असेल त्यातील हयात असलेल्या सर्व घटकव्यक्ती यांच्यामध्ये डोईवार विभागली गेली होती अशाप्रकारे, ती स्थानम् संपत्ती त्यांच्या कुटुंबातील घटकव्यक्ती व स्थानमदाराचे वारसदार यांच्याकडे प्रक्रांत होईल, आणि त्यांच्या कुटुंबातील घटकव्यक्ती व स्थानमदाराचे वारसदार यांच्याकडे येणारे हिस्से ते आपापली स्वतंत्र संपत्ती म्हणून धारण करतील.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, स्थानमदाराच्या कुटुंबामध्ये, जर हा अधिनियम पारित झाला नसता तर रूढीने किंवा परिपाठाने जिचे पुरुष-सदस्य स्थानमदाराच्या स्थानाचे उत्तराधिकारी होण्यास हक्कदार झाले असते अशी त्या कुटुंबाची प्रत्येक शाखा समाविष्ट असेल,—मग ती विभक्त असो किंवा अविभक्त असो.

पुरुषांच्या बाबतीत उत्तराधिकाराचे प्रक्रांत होईल :— सर्वसाधारण नियम.

८. मृत्युपत्र न करता मरण पावणाऱ्या हिंदू पुरुषाची संपत्ती या प्रकरणाच्या उपबंधानुसार प्रक्रांत होईल :—

(क) पहिल्यांदा, जे वारसदार अनुसूचीच्या १ ल्या वर्गामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे नातलग असतील त्यांच्याकडे ;

(ख) दुसऱ्यांदा, जर १ ल्या वर्गामधील कोणताही वारसदार नसेल तर, जे वारसदार अनुसूचीच्या २ ऱ्या वर्गामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे नातलग असतील त्यांच्याकडे ;

(ग) तिसऱ्यांदा, जर दोहोपैकी कोणत्याही वर्गाचा कोणताही वारसदार नसेल तर मृताच्या गोत्रजांकडे; आणि

(घ) शेवटी, जर मृताचा कोणताही गोत्रज नसेल तर त्याच्या भिन्नगोत्रजांकडे.

अनुसूचीतील वारसदारांमध्ये उत्तराधिकाराचा क्रम.

९. अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या वारसदारांपैकी १ ल्या वर्गामध्ये समाविष्ट असलेल्या वारसदारांना एकसमयावच्छेदेकरून संपत्ती मिळेल आणि अन्य सर्व वारसदार वर्जित होतील; २ ऱ्या वर्गामधील पहिल्या नोंदीत समाविष्ट असलेल्यांना दुसऱ्या नोंदीतील वारसदारांपेक्षा अधिमान दिला जाईल; दुसऱ्या नोंदीमध्ये समाविष्ट असलेल्या वारसदारांना तिसऱ्या नोंदीतील वारसदारांपेक्षा अधिमान दिला जाईल; आणि याप्रमाणे पुढे तो अनुक्रमे दिला जाईल.

अनुसूचीच्या १ल्या वर्गामधील वारसदारांमध्ये संपत्तीचे वितरण.

१०. अकृतमृत्युपत्र व्यक्तीची संपत्ती अनुसूचीच्या १ ल्या वर्गामधील वारसदारांमध्ये पुढील नियमानुसार विभागली जाईल :—

**नियम १.**—अकृतमृत्युपत्र व्यक्तीच्या विधवेला, किंवा एकाहून अधिक विधवा असतील तर, सर्व विधवांना एकत्रितपणे एक हिस्सा मिळेल.

**नियम २.**—अकृतमृत्युपत्र व्यक्तीचे हयात असलेले पुत्र आणि कन्या आणि माता यांना प्रत्येकी एक हिस्सा मिळेल.

**नियम ३.**—अकृतमृत्युपत्र व्यक्तीच्या प्रत्येक पूर्वमृत पुत्राच्या किंवा प्रत्येक पूर्वमृत कन्येच्या शाखेतील वारसदारांना आपसात मिळून एक हिस्सा मिळेल.

**नियम ४.**—नियम ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या हिश्श्याचे वितरण—

(एक) पूर्वमृत पुत्राच्या शाखेतील वारसदारांमध्ये अशाप्रकारे करण्यात येईल की, त्याची विधवा (किंवा त्याच्या विधवा एकत्रितपणे) आणि हयात असलेले पुत्र व कन्या यांना समान अंश मिळतील; आणि त्याच्या पूर्वमृत पुत्रांच्या शाखेस तेवढाच अंश मिळेल ;

(दोन) पूर्वमृत कन्येच्या शाखेतील वारसदारांमध्ये अशाप्रकारे करण्यात येईल की, हयात असलेल्या पुत्रांना आणि कन्यांना समान अंश मिळतील.

**अनुसूचीच्या २ऱ्या वर्गामधील वारसदारांमध्ये संपत्तीचे वितरण.**

११. अकृतमृत्युपत्र व्यक्तीची संपत्ती अनुसूचीच्या २ ऱ्या वर्गामधील कोणत्याही एका नोंदीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वारसदारांमध्ये अशाप्रकारे विभागली जाईल की जेणेकरून त्यांना समान हिस्से मिळतील.

**गोत्रज व भिन्नगोत्रज यांच्यामध्ये उत्तराधिकाराचा क्रम.**

१२. प्रकरणपरत्वे, गोत्रज व भिन्नगोत्रज यांच्यामध्ये उत्तराधिकाराचा क्रम याखाली वाटून दिलेल्या अधिमान-नियमांनुसार निर्धारित होईल :

**नियम १.**—दोन वारसदारांपैकी, ज्याला आरोही वंशक्रमाच्या श्रेणी कमी असतील किंवा त्या अजिबात नसतील त्याला अधिमान दिला जाईल.

**नियम २.**—आरोही वंशक्रमाच्या श्रेणींची संख्या तेवढीच किंवा अजिबात नसेल त्या बाबतीत, ज्याला अवरोही वंशक्रमाच्या श्रेणी कमी असतील किंवा अजिबात नसतील त्या वारसदाराला अधिमान दिला जाईल.

**नियम ३.**—जेथे नियम १ किंवा नियम २ खाली कोणताही एक वारसदार दुसऱ्यापेक्षा अधिमान मिळण्यास हक्कदार नसेल तेथे त्यांना एकसमयावच्छेदेकरून हिस्से मिळतील.

**श्रेणींची संगणना.**

१३. (१) गोत्रज किंवा भिन्नगोत्रज यांच्यामध्ये उत्तराधिकाराचा क्रम निर्धारित करण्याच्या प्रयोजनार्थ, नातेसंबंधाची गणना अकृतमृत्युपत्र व्यक्तीपासून वारसदारापर्यंत, आरोही वंशक्रम श्रेणींच्या किंवा प्रकरणपरत्वे, अवरोही वंशक्रम श्रेणींच्या किंवा दोन्हींच्या अनुसार केली जाईल.

(२) आरोही वंशक्रमाच्या श्रेणी आणि अवरोही वंशक्रमाच्या श्रेणी यांची संगणना अकृतमृत्युपत्र व्यक्ती धरून केली जाईल.

(३) प्रत्येक पिढी ही आरोही वंशक्रमाची किंवा अवरोही वंशक्रमाची श्रेणी असते.

**हिंदू स्त्रीची संपत्ती ही तिची अबाधित संपत्ती असणे.**

१४. (१) हिंदू स्त्री, ज्या संपत्तीवर तिचा कब्जा असेल अशी कोणतीही संपत्ती—मग ती या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी संपादन केलेली असो वा नंतर असो—तिची पूर्ण मालक म्हणून धारण करील, मर्यादित मालक म्हणून नव्हे.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमात, "संपत्ती" यात, हिंदू स्त्रीने वारसाहक्काने किंवा मृत्युपत्रीय दानाद्वारे अथवा वाटणीमध्ये, अथवा पोटगी किंवा पोटगीची थकबाकी यांच्याऐवजी, अथवा कोणत्याही व्यक्तीकडून—मग ती नातलग असो वा नसो—तिच्या विवाहाच्या पूर्वी, वेळी किंवा नंतर दानाद्वारे, अथवा तिच्या स्वतःच्या कौशल्याने किंवा परिश्रमाने, अथवा क्रयाने किंवा चिरभोगाने, अथवा अन्य कोणत्याही रीतीने संपादन केलेल्या स्थावर आणि जंगम अशा दोन्ही प्रकारच्या संपत्तीचा व या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी तिने स्त्रीधन म्हणून धारण केलेल्या अशा कोणत्याही संपत्तीचादेखील समावेश आहे.

(२) दानाच्या रूपाने अथवा मृत्युपत्राखाली किंवा अन्य कोणत्याही संलेखाखाली अथवा दिवाणी न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश याखाली अथवा निवाड्याखाली एखादी संपत्ती प्राप्त झालेली असून, दान, मृत्युपत्र किंवा अन्य संलेख किंवा हुकूमनामा, आदेश किंवा निवाडा यांच्या तरतुदींनुसार अशा संपत्तीत मर्यादित हक्कसंबंध विहित केलेला असेल त्या बाबतीत अशा संपत्तीला पोटकलम (१) मध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट लागू असणार नाही.

**हिंदू स्त्रियांच्या बाबतीत उत्तराधिकाराचे सर्वसाधारण नियम**

१५. (१) मृत्युपत्र न करता मरण पावणाऱ्या हिंदू स्त्रीची संपत्ती,—

(क) पहिल्यांदा, पुत्र व कन्या (कोणताही पूर्वमृत पुत्र किंवा कन्या यांची अपत्ये धरून) आणि पती यांच्याकडे;

(ख) दुसऱ्यांदा, पतीच्या वारसदारांकडे;

(ग) तिसऱ्यांदा, माता आणि पिता यांच्याकडे;

(घ) चवथ्यांदा, पित्याच्या वारसदारांकडे; आणि

(ङ) शेवटी, मातेच्या वारसदारांकडे.

कलम १६ मध्ये दिलेल्या नियमांनुसार प्रक्रांत होईल.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) हिंदू स्त्रीला तिच्या पित्याकडून किंवा मातेकडून वारसाहक्काने मिळालेली कोणतीही संपत्ती, मृताचा कोणताही पुत्र किंवा कन्या (कोणत्याही पूर्वमृत पुत्राची किंवा कन्येची अपत्ये धरून) नसल्यास, पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्रमानुसार त्यात निर्दिष्ट केलेल्या वारसदारांकडे नव्हे, तर पित्याच्या वारसदारांकडे प्रक्रांत होईल; आणि

(ख) हिंदू स्त्रीला तिच्या पतीकडून किंवा तिच्या सासऱ्याकडून वारसाहक्काने मिळालेली कोणतीही संपत्ती, मृताचा कोणताही पुत्र किंवा कन्या (कोणत्याही पूर्वमृत पुत्राची किंवा कन्येची अपत्ये धरून) नसल्यास, पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्रमानुसार त्यात निर्दिष्ट केलेल्या अन्य वारसदारांकडे नव्हे, तर पतीच्या वारसदारांकडे प्रक्रांत होईल.

हिंदू स्त्रीच्या वारसदारांमध्ये उत्तराधिकाराचा क्रम व वितरणाची रीत.

१६. कलम १५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या वारसदारांमधील उत्तराधिकाराचा क्रम पुढील नियमांनुसार असेल व त्यांनुसार त्या वारसदारांमध्ये अकृतमृत्युपत्र व्यक्तीच्या संपत्तीचे वितरण होईल, ते असे :—

नियम १.—कलम १५ च्या पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वारसदारांमध्ये एका नोंदीत समाविष्ट असलेल्या वारसदारांना कोणत्याही उत्तरवर्ती नोंदीत समाविष्ट असलेल्यांपेक्षा अधिमान दिला जाईल व एकाच नोंदीत समाविष्ट असलेल्या वारसदारांना एकसमयावच्छेदेकरून ती संपत्ती मिळेल.

नियम २.—जर अकृतमृत्युपत्र व्यक्तीचा कोणताही पुत्र किंवा कन्या अकृतमृत्युपत्र व्यक्तीच्या आधी मृत्यु पावला किंवा पावली असून, त्याच्या मागे त्याची किंवा तिची स्वतःची अपत्ये अकृतमृत्युपत्र व्यक्तीच्या मृत्युसमयी ह्यात असतील तर, अशा पुत्राची किंवा कन्येची अपत्ये यांना आपसात मिळून असा पुत्र किंवा कन्या अकृतमृत्युपत्र व्यक्तीच्या मृत्युसमयी ह्यात असता किंवा असती तर त्याला जो मिळाला असता तो हिस्सा मिळेल.

नियम ३.—अकृतमृत्युपत्र व्यक्तीच्या संपत्तीची कलम १५ चे पोटकलम (१) याच्या खंड (ख), (घ) व (ङ) मध्ये व पोटकलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या वारसदारांकडे होणारी प्रक्रांती, जर ती संपत्ती, प्रकरणपरत्वे, पित्याची किंवा मातेची किंवा पतीची असती आणि अशी व्यक्ती अकृतमृत्युपत्र व्यक्तीच्या मृत्यूच्या लगतनंतर ती संबंधात मृत्युपत्र न करता मरण पावली असती तर, जो क्रम व जे नियम लागू झाले असते त्यांच्याच अनुसार होईल.

मरुमक्कत्तायम व आळियसंतान कायद्याने नियंत्रित होणाऱ्या व्यक्तींसंबंधी विशेष उपबंध.

१७. हा अधिनियम पारित झाला नसता तर, ज्या व्यक्ती मरुमक्कत्तायम किंवा आळियसंतान कायद्यांनी नियंत्रित झाल्या असत्या त्यांच्या संबंधात कलमे ८, १०, १५ व २३ चे उपबंध अशा प्रकारे परिणामक होतील की, जणू काही,—

(एक) कलम ८ च्या उपखंड (ग) व (घ) च्या ऐवजी पुढील मजकूर म्हणजे,—

"(ग) तिसऱ्यांदा, जर त्या दोहोंपैकी कोणत्याही वर्गातील कोणताही वारसदार नसेल तर त्याच्या नातलगाकडे —मग ते गोत्रज असोत वा भिन्नगोत्रज असोत."

घातला होता;

(दोन) कलम १५ च्या पोटकलम (१) च्या (क) ते (ङ) या खंडांच्या ऐवजी पुढील मजकूर म्हणजे :—

"(क) पहिल्यांदा, पुत्र व कन्या (कोणताही पूर्वमृत पुत्र किंवा कन्या यांची अपत्ये धरून) आणि माता यांच्याकडे;

(ख) दुसऱ्यांदा, पिता आणि पती यांच्याकडे;

(ग) तिसऱ्यांदा, मातेच्या वारसदारांकडे;

(घ) चवथ्यांदा, पित्याच्या वारसदारांकडे; आणि

(ङ) शेवटी, पतीच्या वारसदारांकडे."

घातला होता;

(तीन) कलम १५ च्या पोटकलम (२) चा खंड (क) गाळला होता;

(चार) कलम २३ गाळले होते.

### उत्तराधिकारासंबंधी सर्वसाधारण उपबंध

सापत्न नात्यापेक्षा सख्ख्या नात्याला अधिमान.

१८. जर नातेसंबंधाचे स्वरूप अन्य प्रत्येक बाबतीत तेच असेल तर, अकृतमृत्युपत्र व्यक्तीशी सख्ख्या नात्याने संबंधित असलेल्या वारसदारांना सापत्न नात्याने संबंधित असलेल्या वारसदारांपेक्षा अधिमान दिला जाईल.

१९. जर दोन किंवा अधिक वारसदार एकाचवेळी अकृतमृत्युपत्र व्यक्तीच्या संपत्तीचे उत्तराधिकारी होत असतील तर,—— दोन किंवा अधिक वारसदारांच्या उत्तराधिकाराची पद्धत.

(क) या अधिनियमात अन्यथा व्यक्तपणे उपबंधित केले असेल ते खेरीजकरून एरव्ही शाखावार नव्हे तर डोईवार; आणि

(ख) संयुक्त मालक म्हणून नव्हे तर समान मालक म्हणून

त्यांना संपत्ती मिळेल.

२०. अकृतमृत्युपत्र व्यक्तीच्या मृत्युसमयी जे अपत्य गर्भात होते व जे नंतर जिवंत जन्मले त्याला किंवा तिला ते जणू काही अकृतमृत्युपत्र व्यक्तीच्या मृत्युपूर्वी जन्मले होते अशाच प्रकारे अकृतमृत्युपत्र व्यक्तीचा वारसदार होण्याचा अधिकार असेल व अशा प्रकरणी वारसाहक्क अकृतमृत्युपत्र व्यक्तीच्या मृत्यूच्या दिनांकी व तेव्हापासून निहित होतो असे मानले जाईल. गर्भस्थ अपत्याचे अधिकार.

२१. जेव्हा दोन व्यक्ती अशा परिस्थितीत मरण पावल्या असतील की, जीमुळे दोहोंपैकी एक दुसरीच्या मागे हयात होती की काय आणि तसे असल्यास कोण हे अनिश्चित राहते तेव्हा, संपत्तीच्या उत्तराधिकारावर परिणाम करणाऱ्या सर्व प्रयोजनांसाठी, दोघींपैकी वयाने लहान असलेली व्यक्ती वडील व्यक्तीच्या मागे हयात होती असे, तद्विरुद्ध शाबीत होईपर्यंत, गृहीत धरले जाईल. एकसमयावच्छेदी मृत्यूंच्या बाबतीत गृहीतक.

२२. (१) जेथे, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, अकृतमृत्युपत्र व्यक्तीच्या कोणत्याही स्थावर संपत्तीतील अथवा त्याने किंवा तिने——मग एकट्याने असो वा इतरांच्या समवेत असो——चालवलेल्या कोणत्याही धंद्यातील हितसंबंध अनुसूचीच्या १ ल्या वर्गामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दोन किंवा अधिक वारसदारांकडे प्रक्रांत होईल, आणि अशा वारसदारांपैकी कोणाही एकाने संपत्तीतील किंवा धंद्यातील त्याचा किंवा तिचा हितसंबंध हस्तांतरित करावयाचे योजल्यास, हस्तांतरणासाठी योजलेला हितसंबंध संपादन करण्याचा अन्य वारसदारांना अधिमानी अधिकार असेल. विवक्षित बाबतीत संपत्ती संपादन करण्याचा अधिमानी अधिकार.

(२) मृताच्या संपत्तीतील कोणताही हितसंबंध कोणत्या प्रतिफलाबद्दल या कलमाखाली हस्तांतरित करता येईल ते, पक्षांमधील कोणत्याही कराराच्या अभावी, न्यायालयाकडे त्याबाबत अर्ज करण्यात आल्यावर त्याच्याकडून निर्धारित केले जाईल, आणि जर तो हितसंबंध संपादन करण्याचे योजणारी कोणतीही व्यक्ती अशाप्रकारे निर्धारित केलेल्या प्रतिफलाबद्दल तो संपादन करण्यास राजी नसेल तर, अशी व्यक्ती अर्जाचा किंवा त्यास आनुषंगिक असलेला सर्व खर्च देण्यास दायी असेल.

(३) जर या कलमाखाली कोणताही हितसंबंध संपादन करू इच्छिणारे, अनुसूचीच्या १ ल्या वर्गामध्ये विनिर्दिष्ट केलेले दोन किंवा अधिक वारसदार असतील तर, जो वारसदार हस्तांतरणासाठी सर्वाधिक प्रतिफल देऊ करील त्याला अधिमान दिला जाईल.

**स्पष्टीकरण.**——या कलमात, "न्यायालय" याचा अर्थ, ज्याच्या अधिकारितेच्या सीमांच्या आत ती स्थावर संपत्ती असेल किंवा तो धंदा चालवला जात असेल ते न्यायालय असा आहे व राज्य शासन याबाबत शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अन्य कोणत्याही न्यायालयाचा त्यात समावेश आहे.

२३. जेथे एखाद्या अकृतमृत्युपत्र हिंदूच्या मागे अनुसूचीच्या १ ल्या वर्गामध्ये विनिर्दिष्ट केलेले पुरुष व स्त्रिया असे द्विविध वारस हयात असतील व त्याच्या किंवा तिच्या संपत्तीत संपूर्णपणे त्याच्या किंवा तिच्या कुटुंबातील घटकव्यक्तींचे वास्तव्य असणाऱ्या राहत्या घराचा समावेश असेल तेथे, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, अशा कोणत्याही स्त्री-वारसदाराचा राहत्या घराच्या वाटणीची मागणी करण्याचा अधिकार पुरुष वारसदार त्यातील आपापले हिस्से विभागण्याचे ठरवीपर्यंत उद्भवणार नाही, पण स्त्री-वारसदाराला तेथे राहण्याचा अधिकार असेल : राहत्या घरासंबंधी विशेष उपबंध.

परंतु, अशी स्त्री-वारसदार कन्या असेल त्याबाबतीत, जर ती अविवाहित असेल किंवा तिच्या पतीने तिला टाकले असेल किंवा ती त्याच्यापासून विभक्त झाली असेल किंवा विधवा असेल तरच तिला त्या राहत्या घरात राहण्याचा अधिकार प्राप्त होईल.

२४. अकृतमृत्युपत्र व्यक्तीशी जी व्यक्ती पूर्वमृत पुत्राची विधवा, पूर्वमृत पुत्राच्या पूर्वमृत पुत्राची विधवा किंवा भावाची विधवा म्हणून संबंधित आहे अशी कोणतीही वारसदार स्त्री, जर उत्तराधिकार खुला होतो त्या दिनांकास ती पुनर्विवाहित असेल तर, अशी विधवा म्हणून ती अकृतमृत्युपत्र व्यक्तीच्या संपत्तीची उत्तराधिकारी होण्यास हक्कदार असणार नाही. पुनर्विवाह करणाऱ्या विवक्षित विधवा या विधवा म्हणून वारसदार होणार नाहीत.

२५. जी व्यक्ती खून करील किंवा खून करण्यास अपप्रेरणा देईल ती व्यक्ती खून झालेल्या व्यक्तीच्या संपत्तीचा, अथवा ज्या संपत्तीच्या उत्तराधिकाराच्या पुरःसरणार्थ त्याने किंवा तिने खून केला किंवा तो करण्यास अपप्रेरणा दिली अशा अन्य कोणत्याही संपत्तीचा वारसदार होण्यास निरर्ह होईल. खुनी व्यक्ती निरर्ह.

२६. या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा नंतर, एखादा हिंदू धर्मांतर केल्याने हिंदू राहिलेला नसेल किंवा राहिला नाही तर, अशा धर्मांतरानंतर त्याला किंवा तिला झालेली अपत्ये व त्यांचे वंशज जेव्हा उत्तराधिकार खुला होतो त्यावेळेस हिंदू नसतील तर अशी अपत्ये किंवा वंशज आपल्या कोणत्याही हिंदू नातलगांपैकी कोणाच्याही संपत्तीचे वारसदार होण्यास निरर्ह होतील. धर्मांतरित व्यक्तीचे वंशज निरर्ह.

**जेव्हा वारसदार निरर्ह असेल तेव्हाचा उत्तराधिकार.** २७. जर कोणतीही व्यक्ती या अधिनियमाखाली कोणत्याही संपत्तीचा वारसदार होण्यास निरर्ह असेल तर अशी व्यक्ती जणू काही अकृतमृत्युपत्र व्यक्तीच्या आधी मरण पावली होती अशाप्रकारे ती संपत्ती प्रक्रांत होईल.

**व्याधी, वैगुण्य इत्यादींमुळे निरर्हता नाही.** २८. कोणत्याही व्यक्तीला कोणतीही व्याधी, वैगुण्य किंवा व्यंग असल्याच्या कारणावरून अथवा या अधिनियमात उपबंधित केलेले आहे ते खेरीजकरून अन्य कोणत्याही कारणावरून ती कोणत्याही संपत्तीचा उत्तराधिकारी होण्यास निरर्ह होणार नाही.

राजगामिता

**वारसदारांचा अभाव.** २९. जर अकृतमृत्युपत्र व्यक्तीच्या मागे या अधिनियमाच्या उपबंधानुसार त्याच्या किंवा तिच्या संपत्तीचा उत्तराधिकारी होण्यास अर्ह असलेला कोणताही वारसदार हयात नसेल तर, अशी संपत्ती शासनाकडे प्रक्रांत होईल, आणि शासनाला ती संपत्ती, वारसदार ज्यांना अधीन झाला असता त्या सर्व आबंधनांसह व दायित्वांसह प्राप्त होईल.

---

## प्रकरण ३ रे

## मृत्युपत्रीय उत्तराधिकार

**मृत्युपत्रीय उत्तराधिकार.** ३०. [२]* *कोणत्याही हिंदूला, त्याने मृत्युपत्राद्वारे किंवा अन्य मृत्युपत्रीय व्यवस्थेद्वारे विल्हेवाट करण्याजोगी असेल अशा कोणत्याही संपत्तीची भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ (१९२५ चा ३९) याचे उपबंध किंवा त्या त्या काळी अंमलात असलेला व हिंदूंना लागू असलेला अन्य कोणत्याही कायदा यांनुसार तशी विल्हेवाट करता येईल.

**स्पष्टीकरण.**—हिंदू पुरुषाचा मिताक्षरा सहदायकी संपत्तीतील हितसंबंध अथवा तरवड, तवज्जे, इळ्ळम, कुटुंब किंवा कवर यांतील घटकव्यक्तींचा तरवड, तवज्जे, इळ्ळम, कुटुंब किंवा कवर यांच्या संपत्तीतील हितसंबंध, या अधिनियमात किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, या [१][कलमाच्या] अर्थानुसार त्याने किंवा तिने विल्हेवाट करण्याजोगी संपत्ती असल्याचे मानले जाईल.

[३]* * * * * *

---

## प्रकरण ४ थे

## निरसने

**निरसन.** ३१. ['निरसन व विशोधन अधिनियम, १९६०' (१९६० चा ५८)-कलम २ व अनुसूची एक यांद्वारे निरसित.]

---

### अनुसूची

(कलम ८ पहा)

**वर्ग १ ला व वर्ग २ रा यांमधील वारसदार**

**वर्ग १ ला**

पुत्र, कन्या, विधवा, माता, पूर्वमृत पुत्राचा पुत्र, पूर्वमृत पुत्राची कन्या, पूर्वमृत कन्येचा पुत्र, पूर्वमृत कन्येची कन्या, पूर्वमृत पुत्राची विधवा, पूर्वमृत पुत्राच्या पूर्वमृत पुत्राचा पुत्र, पूर्वमृत पुत्राच्या पूर्वमृत पुत्राची कन्या, पूर्वमृत पुत्राच्या पूर्वमृत पुत्राची विधवा.

**वर्ग २ रा**

एक. पिता.

दोन. (१) पुत्राच्या कन्येचा पुत्र, (२) पुत्राच्या कन्येची कन्या, (३) भाऊ, (४) बहीण.

तीन. (१) कन्येच्या पुत्राचा पुत्र, (२) कन्येच्या पुत्राची कन्या, (३) कन्येच्या कन्येचा पुत्र, (४) कन्येच्या कन्येची कन्या.

चार. (१) भावाचा पुत्र, (२) बहिणीचा पुत्र, (३) भावाची कन्या, (४) बहिणीची कन्या.

पाच. पित्याचा पिता, पित्याची माता.

सहा. पित्याची विधवा, भावाची विधवा.

सात. पित्याचा भाऊ, पित्याची बहीण.

आठ. मातेचा पिता, मातेची माता.

नऊ. मातेचा भाऊ, मातेची बहीण.

**स्पष्टीकरण.**—या अनुसूचीत भाऊ किंवा बहीण यांच्या निर्देशांत सोदर भाऊ किंवा बहीण यांच्या निर्देशांचा समावेश नाही.

---

१. १९६० चा अधिनियम ५८, कलम ३ व अनुसूची दुसरी यांद्वारे "(१)" हा आकडा गाळला.
२. १९७४ चा अधिनियम ५६, कलम ३ आणि अनुसूची दुसरी यांद्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
३. १९५६ चा अधिनियम ७८, कलम २९ द्वारे पोटकलम (२) गाळले.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई